# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.02.2026** **वारः शनिवार**

---

1. देशव्यापी एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा आज अजमेर इथं पंतप्रधानांच्या हस्ते आरंभ
2. साणंद इथं पहिल्या स्वदेशी बनावटीच्या सेमीकंडक्टर मेमरी मॉड्यूल्सच्या व्यावसायिक प्रकल्पाचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घघाटन होणार
3. पश्चिम बंगालची मतदार यादी आज दुपारी जाहीर करण्यात येणार आणि
4. देशभरात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**<u>पीएम-एचपीव्ही लसीकरण</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राजस्थान आणि गुजरातला भेट देणार आहेत. अजमेर इथं त्यांच्या हस्ते 14 वर्षे वयोगटातील मुलींसाठी गर्भाशय मुखाच्या कर्करोगावरील एचपीव्ही लसीकरण मोहिमेची सुरुवात होणार आहे. ह्युमन पॅपिलोमा विषाणूमुळं होणारा हा कर्करोग महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगाचा दुसरा सर्वांत मोठा प्रकार आहे. दरवर्षी एक लाख 20 हजारांहून अधिक नवे रुग्ण आढळतात आणि जवळजवळ 80 हजार मृत्यू होतात. लसीकरण आणि लवकर तपासणीद्वारे याचा प्रतिबंध करणे शक्य आहे. हे लक्षात घेऊन ही लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे. दरवर्षी 14 वर्षे वयोगटातील सुमारे 1 कोटी १५ लाख मुलींना ही लस देण्याचे उद्दिष्ट आहे. सर्व सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये ही लस मोफत दिली जाणार आहे. हे लसीकरण ऐच्छिक आहे.

**<u>आयएमए-पीएम पत्र</u>**

इंडियन मेडिकल असोसिएशन अर्थात आयएमएनं केंद्र सरकारच्या मोफत एचपीव्ही लसीकरणाच्या निर्णयाचं स्वागत केलं आहे. हा उपक्रम गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी मोलाचं योगदान देईल, भारतातील लाखो महिलांचे आरोग्य आणि जीवन सुरक्षित करेल, असं आयएमएनं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. देशभरात 1800 हून अधिक स्थानिक शाखांसह, आयएमए या मोहिमेला पाठिंबा देणार आहे.

राजस्थान दौऱ्यादरम्यान, पंतप्रधानांच्या हस्ते अजमेरमध्ये 16 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन, आणि पायाभरणी होणार आहे. त्यानंतर, ते एका सार्वजनिक सभेलाही संबोधित करतील. राजस्थानमधील सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने भरती झालेल्या 21 हजार 800 हून अधिक तरुणांना नियुक्ती पत्रांचंही वाटप त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>पंतप्रधान-गुजरात दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दुपारी गुजरातमधील साणंद इथं मायक्रोन टेक्नॉलॉजीच्या अत्याधुनिक सेमीकंडक्टर प्रकल्पाचं उद्घघाटन होणार आहे. इंडिया सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत 22,500 कोटींहून अधिक गुंतवणूक असलेला हा पहिला मेड-इन-इंडिया सेमीकंडक्टर मेमरी मॉड्यूल्सचा व्यावसायिक उत्पादन प्रकल्प असून इथून अधिकृत निर्यातदेखील सुरू होणार आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रातील भारताच्या आत्मनिर्भरतेच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. यावेळी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित राहतील.

**कॅनडा पंतप्रधान**

कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांचं चार दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी काल दुपारी मुंबईत आगमन झालं. पदभार स्वीकारल्यानंतर कार्नी यांचा हा पहिलाच अधिकृत भारत दौरा आहे. मुंबईतील दोन दिवसांच्या वास्तव्यात ते विविध क्षेत्रातील भारतीय आणि कॅनडाच्या मान्यवरांशी संवाद साधतील, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हंटलं आहे. दरम्यान, उद्या ते नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आजपासून केरळमच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. चांगनासेरी इथल्या सेंट बर्चमन्स कॉलेजच्या शताब्दी समारंभाच्या समारोप कार्यक्रमाला ते आज उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते उद्या त्रिशूरमधील देवमाथा सीएमआय पब्लिक स्कूलमध्ये चेतना गानाश्रमाची पायाभरणी होणार आहे. तिरुवनंतपुरममधील सेंट स्टीफन्स हायस्कूलच्या शताब्दी समारंभालाही ते उपस्थित राहणार आहेत.

**पश्चिम बंगाल-मतदार यादी**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक आयोग आज दुपारी दोन वाजता पश्चिम बंगालची अपूर्ण अंतिम मतदार यादी जाहीर करणार आहे. या मसुदा यादीमध्ये सात कोटी आठ लाख मतदारांची नावे असतील, जी अंतिम यादीत राहतील. ही यादी तीन श्रेणींमध्ये विभागली जाणार आहे. या यादीत ज्यांचे अर्ज मंजूर झाले आहेत त्यांची नावे असतीलच त्याचबरोबर ज्यांची नावे वगळली जात आहेत त्यांच्या बाजूला डिलीट हा शब्द लिहिलेला असेल आणि ज्यांची कागदपत्रे अद्याप न्यायालयीन निरीक्षणासाठी आहेत, त्यांच्या नावापुढे निर्णय हा शब्द लिहिला जाईल. अशा लोकांची संख्या 60 लाख आहे.

ही यादी निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे संकेतस्थळ आणि ईसीआय नेट ॲपवर पाहता येईल. तसंच सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनाही त्याच्या प्रती पाठवल्या जातील. याव्यतिरिक्त, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना दोन प्रत्यक्ष कागदी प्रती दिल्या जातील. जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि गट विकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयांना या प्रती पाठवल्या जात आहेत, तिथं जाऊन नागरिक ही मतदार यादी पाहू शकतील, असं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज कुमार अग्रवाल यांनी सांगितलं.

**राष्ट्रीय विज्ञान दिन**

नोबेल पुरस्कार विजेते ज्येष्ठ शास्त्रज्ञ सी व्ही रामन यांनी, रामन इफेक्ट हा महत्त्वपूर्ण शोध लावला, त्या घटनेचं स्मरण म्हणून आजचा दिवस देशभरात राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त देशभरातील विविध विज्ञान संस्थामध्ये प्रदर्शने, शास्त्रज्ञांशी संवाद आणि वैज्ञानिक प्रयोगांचे आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यातील आयुका, आयसर, जीएमआरटी आणि पुणे वेधशाळा या संस्थांमध्येही प्रदर्शनं, शास्त्रज्ञांशी संवाद आणि विविध वैज्ञानिक प्रयोगांचं आयोजन करण्यात आले आहे.

**अमित शाह- बिहार**

बिहारमधील भारत-नेपाळ सीमेवरील सीमावर्ती जिल्ह्यांशी संबंधित सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांचा आढावा घेण्यासाठी काल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एक उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. यावेळी जंगल आणि निर्जन भागातील बेकायदेशीर बांधकामांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आणि नो मॅन्स लँडवरील अतिक्रमणं त्वरित हटवण्याचे आदेश शहा यांनी दिले. या बैठकीत सीमावर्ती भागांजवळील बेकायदेशीर बांधकामे, बेकायदेशीर स्थलांतर, बनावट भारतीय चलनी नोटा, अतिक्रमण यासारख्या समस्या सोडवण्यासाठी कठोर कारवाईवर करण्यावरही भर देण्यात आला.

**अमेरिका-इराण**

अमेरिका आणि इराण यांच्यात जिनेव्हा इथं काल झालेली अणुचर्चेची फेरी निष्फळ ठरली. त्यामुळं अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कायम आहे. इराणशी आतापर्यंत झालेल्या चर्चेवर समाधानी नसलो तरीही त्यांच्या अणुकार्यक्रमाबाबत पश्चिम आशियातील देशांशी इराणच्या वाटाघाटी होईपर्यंत वाट पाहण्याची तयारी असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल सांगितलं. इराणला अण्वस्त्रे बाळगू देता येणार नाही असं ते म्हणाले. इराणनं अणुकार्यक्रम थांबवण्यासाठी दूरगामी करार करण्यास सहमती दर्शविली नाही, तर लष्करी कारवाईची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. तर शांततापूर्ण हेतूंसाठी युरेनियम समृद्ध होण्याचा अधिकार इराणला आहे, असं सांगत इराणनं अण्वस्त्र विकसित केल्याचं नाकारलं आहे.

**अफगाणिस्तान-पाकिस्तान संघर्ष**

पाकिस्तानसोबत सुरू असलेला संघर्ष संवाद आणि राजकीय मार्गाने सोडवू इच्छित असल्याचं अफगाणिस्ताननं म्हटलं आहे. अफगाणिस्ताननं देशाच्या सार्वभौमत्वाचं रक्षण करण्यासाठी कारवाई केल्याचं स्पष्ट केलं आहे. अफगाणिस्तानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्तकी यांनी सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री प्रिन्स फैसल बिन फरहान अल सौद यांच्याशी तसंच कतारचे राज्यमंत्री मोहम्मद बिन अब्दुलअझीझ अल-खुलाइफी यांच्याशी आणि तुर्कीचे परराष्ट्र मंत्री हकान फिदान यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली.

**आर्थिक विकास**

जागतिक अनिश्चितता असूनही देशाची आर्थिक कामगिरी स्थिर आहे, व्यापक आर्थिक उलाढालींमुळे भारतीय अर्थव्यवस्था मजबूत वाढीची गती राखत आहे, असं मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना सांगितलं. एकूण देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपीचे अंदाज अधिक अचूक ठरण्यासाठी नवी निर्देशांक मालिका तयार करण्यात आली असून, यात आधारभूत वर्ष 2022-23 करण्यात आलं असल्याचंही त्यांनी सांगितलं. यावेळी सांख्यिकी मंत्रालयाचे सचिव सौरभ गर्ग म्हणाले की, 2022-23 या नवीन आधार वर्षानुसार चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर 7.8 टक्के आहे, तर नाममात्र जीडीपी अंदाज 8.9 टक्के आहे.

**क्रिकेट**

आयसीसी पुरुष टी-20 विश्वचषक स्पर्धेत, काल रात्री कोलंबो इथं झालेल्या सुपर 8 फेरीतील गट 2 मधील सामन्यात इंग्लंडनं न्यूझीलंडचा 4 गडी राखून पराभव केला. न्यूझीलंडनं दिलेल्या 160 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडनं 19 षटकं आणि 3 चेंडूत 6 बाद 161 धावा केल्या. इंग्लंडकडून टॉम बँटननं सर्वाधिक 33 धावा केल्या तर विल जॅक्सनं नाबाद 32 धावा केल्या. त्याला सामनावीरचा पुरस्कार देण्यात आला. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्रनं 3 गडी बाद केले. दरम्यान, सुपर 8 फेरीतील गट 2 मध्ये आज पाकिस्तानचा सामना श्रीलंकेशी होणार आहे, तर उद्या भारताचा सामना वेस्ट इंडिजबरोबर कोलकाता इथं होणार आहे. या स्पर्धेतील उपांत्य सामने 4 आणि 5 मार्चला तर अंतिम सामना आठ मार्चला होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.